(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

मुद्दा क्र. २ न्यायालय क्र. ५ (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) कलम- जनहित याचिका (रिट)

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

कार्यवाहीचे अभिलेख

एस. एम. डब्ल्यू. (सी) क्र. (अनेक) ६/२०२१

रस्त्यावरील मुलांच्या परिस्थिती बाबतीत

( [ फक्त रि. या. (फौ.) क्र. २७४/२०२० या मुद्याखाली सूचीबद्ध आहे ] )

सोबत

रि. या. (फौ.) क्र. २७४/२०२० जनहित याचिका (रिट)

(आय ए क्र. १३९२७७ / २०२१ - प्रतिज्ञापत्र दाखल करण्यापासून सूट

आय. ए. क्र. १०२८६ / २०२१ - प्रतिज्ञापत्र दाखल करण्यापासून सूट

आय. ए. क्र. ८३११ / २०२१ - प्रतिज्ञापत्र दाखल करण्यापासून सूट

आय. ए. क्र. ९७३११ / २०२० - अंतरिम दिलासा देणे

तारीख : ०१-०२-२०२२ या याचिकेवर आज सुनावणी घेण्यात आली.

न्यायमंच :

माननीय न्यायमूर्ती श्री. एल. नागेश्वरा राव

माननीय न्यायमूर्ती श्री. बी. आर. गवई

पक्षांसाठी : न्यायालयीन चालनाद्वारे

श्री. गौरव अग्रवाल, अभिलेखावरील अधिवक्ता (न्याय मित्र )

सुश्री अनिता शेनॉय, वरिष्ठ अधिवक्ता.

सुश्री सृष्टि अग्निहोत्री, अभिलेखावरील अधिवक्ता

श्री. अभिषेक जेबाराज, अधिवक्ता

सुश्री कृति अवस्थी, अधिवक्ता

सुश्री निमिषा मेनन, अधिवक्ता

सुश्री प्रियंका माली, अधिवक्ता

साजिया मुकादम, अधिवक्ता

श्री. संभव गुप्ता, अधिवक्ता

सुश्री संजना ग्रेस थॉमस, अधिवक्ता

सुश्री आरती कृपा कुमार, अधिवक्ता

ए. रेयना श्रुती, अधिवक्ता

| | |
|---|---|
| एन. सी. पी. सी. आर.साठी | सुश्री स्वरूपमा चतुर्वेदी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री सौम्या कपूर, अधिवक्ता |
| | श्री. के. एम. नटराज, विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता |
| | श्री. अक्षय अमृतांशू, अधिवक्ता |
| | श्रीमती स्वाती घिल्डियाल, अधिवक्ता |
| | श्री. दिग्विजय दाम, अधिवक्ता |
| | श्री. मनीष, अधिवक्ता |
| | श्री. विनायक शर्मा, अधिवक्ता |
| | श्री. एस. एस. रिबेलो, अधिवक्ता |
| | श्री. एम. के. मरोरिया, अभिलेखावरील अधिवक्ता |
| भारताचे संघ | श्री. ऐश्वर्य भाटी, अतिरिक्त महान्यायअभिकर्ता |
| | श्री. अक्षय अमृतांशू, अधिवक्ता |
| | श्रीमती स्वाती घिल्डियाल, अधिवक्ता |
| | श्री. एस. एस. रिबेलो, अधिवक्ता |
| | सुश्री चिन्मयी चंद्रा, अधिवक्ता |
| | श्री. बी. वी. बलराम दास, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. जी. एस. मक्कर, अभिलेखावरील अधिवक्ता |

| | |
|---|---|
| छत्तीसगड राज्य | श्री. एस. सी. वर्मा, वरिष्ठ अधिवक्ता / महाधिवक्ता |
| | श्री. सुमीर सोधी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. अर्जुन नंदा, अधिवक्ता |
| | श्री. गौरव, अधिवक्ता |
| पश्चिम बंगाल राज्य | श्री. सुहान मुखर्जी, अधिवक्ता |
| | श्री. विशाल प्रसाद, अधिवक्ता |
| | श्री. निखिल परीक्षित, अधिवक्ता |
| | श्री. अभिषेक मनचंदा, अधिवक्ता |
| | श्री. सायनदीप पहाडी, अधिवक्ता |
| | पी. एल. आर. चेंबर्स अँड कंपनी |
| तेलंगणा राज्य | श्री. एस. उदयकुमार सागर, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री स्वीना नायर, अधिवक्ता |
| | श्री. पी. मोहिथ राव, अधिवक्ता |
| मिझोरम राज्य | श्री. सिद्धेश कोतवाल, अधिवक्ता |
| | सुश्री एना उपाध्याय, अधिवक्ता |
| | सुश्री मान्या हसीजा, अधिवक्ता |
| | सुश्री प्रज्ञा बरसैयान, अधिवक्ता |
| | श्री. आकाश सिंग, अधिवक्ता |
| | श्री. निर्णीमेश दुबे, अभिलेखावरील अधिवक्ता |
| हरियाणा राज्य | सुश्री बांसुरी स्वराज, अतिरिक्त महान्यायअभिकर्ता |
| | डॉ. मोनिका गुसैन, अभिलेखावरील अधिवक्ता |
| गोवा राज्य | श्री. रवींद्र ए. लोखंडे, अधिवक्ता |
| | श्री. अभिषेक अत्रे, अधिवक्ता |
| | सुश्री अंबिका अत्रे, अधिवक्ता |

| | |
|---|---|
| | डॉ. विद्युतमा झा, अधिवक्ता |
| गोवा राज्य | श्री. अरुण आर. पेडनेकर, अधिवक्ता |
| | सुश्री मुक्ती चौधरी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| ए. पी. राज्य | श्री. महफूज ए. नाझकी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. पोलंकी गौथम, अधिवक्ता |
| | शेख मोहम्मद हनीफ, अधिवक्ता. |
| | श्री. टी. विजया भास्कर रेड्डी, अधिवक्ता |
| | श्री. के. व्ही. गिरीश चौधरी, अधिवक्ता |
| | सुश्री राजेश्वरी मुखर्जी, अधिवक्ता |
| बिहार राज्य | श्री. मनीष कुमार, अभिलेखावरील अधिवक्ता |
| एच. पी. राज्य | श्री. हिमांशु त्यागी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| मणिपूर राज्य | श्री. पुखरंबम रमेश कुमार, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री अनुपमा एनगंगोम, अधिवक्ता |
| | श्री. करुण शर्मा, अधिवक्ता |
| पुदुचेरी केंद्रशासित प्रदेश | श्री. अरविंध एस, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री सी. रुबावती, अधिवक्ता |
| | श्री. निशे राजन शोंकर, अधिवक्ता |
| | सुश्री अनु के जॉय, अधिवक्ता |
| | श्री. अलीम अनवर, अधिवक्ता |
| त्रिपुरा राज्य | श्री. शुवोदीप रॉय, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. कबीर शंकर बोस, अधिवक्ता |
| | श्री. ईशान बोरठाकुर, अधिवक्ता |
| गुजरात राज्य | सुश्री दीपांविता प्रियंका, अभिलेखावरील अधिवक्ता |

| | |
|---|---|
| मेघालय राज्य | श्री. अविजित मणी त्रिपाठी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. उपेंद्र मिश्रा, अधिवक्ता |
| | श्री. किनफॅम व्ही. खार्लिंगडोह, अधिवक्ता |
| | श्री. टी.के. नायक, अधिवक्ता |
| पंजाब राज्य | सुश्री जसप्रित गोगिया, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री मंदाकिनी सिंग, अधिवक्ता |
| | श्री. करणवीर गोगिया, अधिवक्ता |
| | सुश्री शिवांगी सिंघल, अधिवक्ता |
| | श्री. वर्णिका गुप्ता, अधिवक्ता |
| | सुश्री आशिमा मंडला, अधिवक्ता |
| टी. एन. राज्य | डॉ. जोसेफ अॅरिस्टॉटल एस, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री प्रीती सिंग, अधिवक्ता |
| | सुश्री नुपूर शर्मा, अधिवक्ता |
| | श्री. संजीव कुमार महारा, अधिवक्ता |
| नागालँड राज्य | सुश्री के. एनाटोली सेमा, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. अमित कुमार सिंग, अधिवक्ता |
| | सुश्री चुबलेमला चांग, अधिवक्ता |
| एन. सी. टी. दिल्ली | श्री. चिराग एम. श्रॉफ, अभिलेखावरील अधिवक्ता |
| महा. राज्य | श्री. सचिन पाटील, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. राहुल चिटणीस, अधिवक्ता |
| | श्री. आदित्य ए. पांडे, अधिवक्ता |
| | श्री. जिओ जोसेफ, अधिवक्ता |
| | सुश्री श्वेतल शेपाल, अधिवक्ता |

| | |
|---|---|
| ए अँड एन केंद्रशासित प्रदेश | श्री. समीर अली खान, अभिलेखावरील अधिवक्ता |
| झारखंड राज्य | सुश्री प्रज्ञा बघेल, अधिवक्ता |
| | सुश्री पल्लवी लंगर, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री शेली सिंग, अधिवक्ता |
| सिक्कीम राज्य | श्री. राघवेंद्र कुमार, अधिवक्ता |
| | श्री. आनंद कुमार दुबे, अधिवक्ता |
| | श्री. निशांत वर्मा, अधिवक्ता |
| | श्री. राजीव कुमार सिन्हा, अधिवक्ता |
| | श्री. सिमांता कुमार, अधिवक्ता |
| | श्री. नरेंद्र कुमार, अभिलेखावरील अधिवक्ता |
| एम. पी. राज्य | सुश्री अंकिता चौधरी, उप महान्यायवादी |
| | श्री. पशुपती नाथ राजदान, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री मैत्रेयी जगत जोशी, अधिवक्ता |
| | श्री. प्रखर श्रीवास्तव, अधिवक्ता |
| | सुश्री स्नेह बैरवा, अधिवक्ता |
| हाई कोर्ट ऑफ़ एमपी | श्री. अर्जुन गर्ग, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री सगुन श्रीवास्तव, अधिवक्ता |
| चंडीगढ़ केंद्रशासित प्रदेश | श्री. अंकित गोयल, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री शोभा गुप्ता, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. राजेंद्रकुमार पाणिग्रही, अधिवक्ता |
| | जेसी कुरियन, अधिवक्ता |
| | श्री. निशांत बहुगुणा, अधिवक्ता |
| अंमलबजावणीसाठी | श्री. अंकुर एस. कुलकर्णी, अभिलेखावरील अधिवक्ता |

| | |
|---|---|
| | श्री. सुशील जोसेफ सिरियाक, अधिवक्ता |
| | सुश्री उदिथा चक्रवर्थी, अधिवक्ता |
| हरियाणा | श्री. शेखर राज शर्मा, उप महान्यायवादी |
| | श्री. संजय कुमार विसेन, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. पारस दत्ता, अधिवक्ता |
| | श्री. भंवर जादोन, अधिवक्ता |
| | सुश्री बबीता मिश्रा, अधिवक्ता |
| | श्री. अमित गुप्ता, अधिवक्ता |
| | श्री. संजीव प्रकाश उपाध्याय, अधिवक्ता |
| | सुश्री आदिरा ए. नायर, अधिवक्ता |
| | श्री. अजय बन्सल, अतिरिक्त महान्यायवादी |
| | श्री. गौरव यादव, अधिवक्ता |
| | सुश्री वीणा बन्सल, अधिवक्ता |
| | श्री. संजय कुमार विसेन, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री.निखिल गोयल, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री नवीन गोयल, अधिवक्ता |
| | श्री. विनय मॅथ्यू, अधिवक्ता |
| | श्री. कुणाल चॅटर्जी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री मैत्रेयी बॅनर्जी, अधिवक्ता |
| | श्री. रोहित बन्सल, अधिवक्ता |
| | श्री. मालक मनीष भट्ट, अभिलेखावरील अधिवक्ता |
| आसाम राज्य | सुश्री दीक्षा राय, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. अंकित अग्रवाल, अधिवक्ता |
| | सुश्री रागिनी पांडे, अधिवक्ता |

| | |
|---|---|
| अरुणाचल प्रदेश राज्य | श्री. अभिमन्यू तिवारी, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री एलिझा बार, अधिवक्ता |
| | श्री. निशांत पाटील, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. जी. प्रकाश, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | प्रीति सिंग, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. के. एनाटोली सेमा, अभिलेखावरील अधिवक्ता |
| राजस्थान राज्य | डॉ. मनीष सिंघवी, वरिष्ठ अधिवक्ता |
| | श्री. अर्पित प्रकाश, अधिवक्ता |
| | श्री. संदीप कुमार झा, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. सिबो शंकर मिश्रा, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | सुश्री उत्तरा बब्बर, अभिलेखावरील अधिवक्ता |
| | श्री. एम. योगेश कन्ना, अभिलेखावरील अधिवक्ता |

वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने पुढील प्रमाणे आदेश दिले :-

<u>रि. या. (फौ.) क्र. २७४/२०२०</u>

१. ही रिट याचिका खालील दिलासा मिळण्याकरिता दाखल करण्यात आली आहे :-

"(अ) कोविड-१९ महामारीच्या काळात, जिल्हे/राज्ये/ देशांमधील मानवी तस्करीच्या पिडीत /साक्षीदार बालकांच्या पुराव्याची नोंद, ज्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ अंतर्गत विधाने समाविष्ट आहेत, सामान्यतः अशा मुलांच्या निवासस्थानाच्या स्थानिक अधिकारक्षेत्रातील सरकारी सुविधेतून वीडियो- कॉन्फ्रेंसिंग द्वारे केली पाहिजे, असे निर्देश देणारे परमादेश किंवा तत्सम स्वरूपाचे रिट/निर्देश जारी करण्यात यावे;

(ब) कोविड-१९ महामारी संपुष्टात आल्यानंतरही, जिल्हे/राज्ये/ देशांमधील मानवी तस्करीच्या साक्षीदार/ पिडीत बालकांच्या विधानांची/पुराव्याची नोंद वीडियो- कॉन्फ्रेंसिंग द्वारे, एकतर आयोगाद्वारे किंवा न्यायालय संकुलात/ मुलाच्या निवासस्थानाच्या जवळच्या बाल कल्याण समिती (सी.डब्ल्यू.सी) मध्ये करण्याचे निर्देश देणारे परमादेश किंवा तत्सम स्वरूपाचे रिट/निर्देश जारी करण्यात यावे;

(क) एक सशक्त वीडियो- कॉन्फ्रेंसिंग यंत्रणा तयार करण्यासाठी देशभरातील जिल्हा न्यायालयांमध्ये पुरेशा पायाभूत सुविधांची व्याप्ती सुनिश्चित करण्यासाठी उत्तरवादींना निर्देश देणारे परमादेश किंवा तत्सम स्वरूपाचे रिट/निर्देश जारी करण्यात यावे;

(ड) उत्तरवादी क्र. ३ (राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग) ला कोविड-१९ महामारीच्या काळात आणि नंतर 'मुलांचे सर्वोत्तम हित' या तत्त्वांचा विचार करून, आणि अश्या बालक साक्षीदार / पिडीतांचे वीडियो- कॉन्फ्रेंसिंग द्वारे साक्ष आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ अंतर्गत विधाने नोंदविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे निर्देश देणारे परमादेश किंवा तत्सम स्वरूपाचे रिट/निर्देश जारी करण्यात यावे;

२. विद्वान न्यायमित्र श्री. गौरव अग्रवाल यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडणाऱ्या अधिवक्त्यांशी सविस्तर चर्चा केल्यानंतर एक प्रायोगिक प्रकल्प प्रस्तावित केला. प्रायोगिक प्रकल्पाच्या उद्देशाने, विद्वान न्यायमित्रांनी चार प्रकरणे निवडली. त्यापैकी दोन प्रकरणांमध्ये न्यायचौकशी सुरु झाली होती, ज्याच्या संदर्भात वीडियो- कॉन्फ्रेंसिंग द्वारे साक्षीदारांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात यावेत अशी विनंती करण्यात आली होती. प्रथम खबरी अहवाल क्र. ६१२/२०१८, दिनांक ०५/१२/२०१८ अन्वये एस सी क्र. १५१/२०१९ (**राज्य -विरुद्ध- रहमतुल्ला**), हे बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ ("**बा. न्या. अधि.**") च्या कलम ७५/७९, बाल आणि किशोरवयीन कामगार (प्रतिबंध आणि विनियम) कायदा, १९८६ ("**बा. का. अधि.**") च्या कलम ३/३अ /१४, बंधुआ कामगार प्रणाली (निर्मूलन) कायदा, १९७६ ("**बं. का. नि.**") च्या कलम १६/१७/१८ आणि भारतीय दंड संहिता, १८६० (**भा. द. वि.**) च्या कलम ३७०/३७४ अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आले होते. या प्रकरणाची संक्षिप्त तथ्ये अशी आहेत की, दिनांक ०५/१२/२०१८ रोजी सूट/कोट

कव्हर शिवण्याच्या कामात गुंतलेल्या ११ मुलांना करावल नगर, ईशान्य दिल्ली, पो. स्टे. खजुरी खास येथील परिसरातून आकस्मिक बचाव मोहिमेद्वारे सुटका करण्यात आली. सुटका करण्यात आलेल्या मुलांना त्यांच्या मूळ गावी म्हणजे बिहारच्या सीतामढी आणि पूर्व चंपारण जिल्ह्यांमध्ये पाठविण्यात आले. सदर प्रकरण अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, कर्कडूमा, नवी दिल्ली यांच्या न्यायालयात प्रलंबित होते. प्रकरण क्र. ५२/२०१९ (राज्य-विरुद्ध- मोहम्मद शेरजहान) असलेले दुसरे प्रकरण, प्रथम खबरी अहवाल क्र. २०/२०१९ शी संबंधित आहे, जे भारतीय दंड संहितेच्या कलम ३७०(५)/३४४/३७४, बा. का. अधि. च्या कलम ३/१४ आणि बा. न्या. अधि. च्या कलम ७५/७९ अन्वये जयपूर येथे नोंदविण्यात आले. दिनांक ०८/०१/२०१९ रोजी मानव तस्करी विरोधी पथकाने चार मुलांची सुटका केली, ज्यांना जयपूर येथे एका बंदिस्त खोलीत बांगड्या बनविण्यास भाग पाडले होते. त्यांना बाहेर जाण्याची परवानगी नव्हती, पुरेसे अन्न दिले जात नव्हते आणि धमक्या देऊन काम करण्यास भाग पाडले जात होते. सुटका करण्यात आलेल्या मुलांना बिहारमधील पटना आणि गया येथील त्यांच्या घरी पाठविण्यात आले. या प्रकरणाची न्यायचौकशी पॉक्सो न्यायालय-२, जयपूर येथे होणार होती.

३. विद्वान न्यायमित्रांनी सादर केले की, प्रायोगिक प्रकल्प तीन टप्प्यात असेल, ज्यामध्ये पहिला टप्पा न्यायालयाचे ठिकाण आणि दूरस्थ ठिकाण येथील आधारभूत संरचनेच्या स्थितीच्या मूल्यांकनावर केंद्रित असेल. न्यायालयाचे ठिकाण हे ज्या शहरांमध्ये किंवा ज्या ठिकाणी न्यायचौकशी व्हायची आहे, त्या ठिकाणी आहे आणि दूरस्थ ठिकाण हे जिल्हा/तालुका मध्ये न्यायालयाचे संकुल किंवा पिडीत / साक्षीदारांच्या निवासस्थानाजवळील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय आहे. या प्रक्रियेचा अविभाज्य भाग असलेल्या इतर सुविधांसह, वीडियो-कॉन्फ्रेंसिंगसाठी आवश्यक उपकरणांची उपलब्धता, पहिल्या टप्प्यात विनिश्चित केली जाणार होती. दुस-या टप्प्यात न्यायालयाच्या ठिकाणी न्यायाधीश साक्षीदारांच्या तपासणीसाठी तारीख निश्चित करतील आणि त्यानंतर साक्षीदारांना समन्स बजावतील. विद्वान न्यायमित्रांनी असे सूचित केले की, समन्स मार्फत साक्षीदारांना (i) दूरस्थ ठिकाणचा पत्ता आणि सुनावणीची तारीख आणि वेळ, (ii) नाव, संपर्काचा तपशील

आणि दूरस्थ बिंदू समन्वयकाच्या ("**दू.बि.स.**") भूमिकेचे थोडक्यात स्पष्टीकरण, (iii) ओळखीचा पुरावा बाळगण्याची आवश्यकता याबद्दल माहिती दिली पाहिजे. तिसरा टप्पा दूरस्थ ठिकाणावर बाल साक्षीदारांची प्रत्यक्ष तपासणी आणि साक्षीदारांची कॅमेऱ्यात आणि कोणत्याही प्रभावाशिवाय तपासणी केली जात आहे याची खात्री करण्यासाठी पाळल्या जाणाऱ्या कार्यपद्धतीशी संबंधित आहे.

४. दूरस्थ ठिकाणी बाल साक्षीदारांच्या तपासणीच्या तपासणी प्रक्रियेवर समाधानी झाल्यानंतर, विद्वान न्यायमित्रांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडणाऱ्या विद्वान वरिष्ठ अधिवक्ता सुश्री अनिता शेनॉय यांच्याशी परामर्श करून, दिनांक १२/०४/२०२१ रोजी पाच टप्प्यांसह मानक संचालन प्रक्रियेचा ("**एस. ओ. पी**") मसुदा सादर केला. दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये, या न्यायालयाने सर्व राज्य सरकारे/केंद्रशासित प्रदेश तसेच उच्च न्यायालयास एस. ओ. पी च्या मसुद्याची बजावणी करून त्यांचा अभिप्राय सादर करण्याचे निर्देश दिले. उच्च न्यायालयांकडून प्रतिसाद मिळाल्यानंतर, विद्वान न्यायमित्रांनी वीडियो-कॉन्फ्रेंसिंग द्वारे मुलांची पुरावे नोंदवण्यासाठी सुधारित मसुदा एस. ओ. पी. सह एक टिप्पणी सादर केली. विद्वान न्यायमित्रांनी सुचवलेली मसुदा एस. ओ. पी. खालीलप्रमाणे आहे :-

१. आंतरराज्य/आंतरजिल्हा बाल तस्करीला बळी पडलेल्या मुलांची साक्ष, एकतर जिल्ह्यातील न्यायालय संकुलाच्या वीडियो- कॉन्फ्रेंसिंग कक्षात किंवा जिल्ह्याच्या न्यायालय संकुलातील असुरक्षित साक्षीदार कक्षात किंवा मुलाचे वास्तव्य असलेल्या जिल्ह्यातील डीएलएसए (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) च्या कार्यालयात वीडियो- कॉन्फ्रेंसिंग द्वारे नोंदविण्यात यावी, असे सुचविले आहे.

२. वरील गोष्टी सुलभ करण्यासाठी, सर्व जिल्ह्यांच्या विद्वान जिल्हा न्यायाधीशांनी जिल्हा/तालुका न्यायालय संकुल किंवा डीएलएसए च्या कार्यालयात वीडियो- कॉन्फ्रेंसिंग उपलब्ध असल्याचे निश्चित करावे आणि त्या अधिकारक्षेत्रातील उच्च न्यायालयाला कळवावे , अशी प्रार्थना केली आली आहे. उच्च न्यायालयाला ही माहिती त्याच्या संकेतस्थळावर दिनांक ३०/०४/२०२२ रोजी किंवा त्यापूर्वी टाकण्याची विनंती केली जाऊ शकते. पुढे, प्रत्येक

जिल्ह्यात, विशेषतः ज्या राज्यांमध्ये बाल तस्करीची प्रकरणे जास्त आहेत, तेथे पायाभूत सुविधा/सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जावेत, अशी प्रार्थना केली आहे.

३. बाल साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यासाठी जिल्ह्याच्या डीएलएसए च्या सचिवाला दूरस्थ बिंदू समन्वयक (आर. पी. सी.) होण्याची विनंती केली जाऊ शकते. तथापि, डीएलएसए च्या अध्यक्षांना आवश्यक किंवा इष्ट वाटत असल्यास, तो/ती दूरस्थ बिंदू समन्वयक म्हणून निवृत्त न्यायिक अधिकाऱ्याची नियुक्ती करू शकतात. माननीय उच्च न्यायालयांनी उपरोक्त माहिती म्हणजे प्रत्येक जिल्ह्याच्या दूरस्थ बिंदू समन्वयक (आर. पी. सी.) ची नावे आणि संपर्क तपशील, वरील परिच्छेद क्र. २ मधील माहितीसह संकेतस्थळावर टाकावी, अशी प्रार्थना केली आहे.

४. जेव्हा आंतरराज्य/आंतर-जिल्हा बाल तस्करीचा गुन्हा न्यायालयाद्वारे न्यायचौकशी साठी घेतला जातो आणि जर न्यायालय बिंदू आणि दूरस्थ येथे वीडियो- कॉन्फ्रेंसिंगची सुविधा असेल, तर न्यायचौकशी न्यायालयाने सामान्यतः वीडियो- कॉन्फ्रेंसिंगद्वारे बाल साक्षीदाराच्या तपासणीला प्राधान्य दिले पाहिजे.

५. न्यायालय बिंदूवरील प्राधिकारी दूरस्थ बिंदूवर असलेल्या आर. पी. सी. शी संपर्क साधू शकतो आणि वीडियो- कॉन्फ्रेंसिंगद्वारे बाल साक्षीदाराचे निवेदन नोंदविण्यासाठी सर्व पद्धती तयार करू शकतो.

६. वीडियो- कॉन्फ्रेंसिंग शक्य असल्यास, साक्षीदार (अनेक) च्या तपासणीसाठी न्यायचौकशी न्यायालयाद्वारे तारीख आणि वेळ निश्चित केला जाऊ शकतो. आर. पी. सी. समोर पुराव्यासाठी व्यक्तिशः हजर राहण्यासाठी बाल साक्षीदाराला (अनेक) समन्स जारी केले जाऊ शकते. याशिवाय दूरस्थ बिंदूच्या स्थानिक आदेशिका वाहकद्वारे समन्स पाठविले जाऊ शकतात. साक्षीदाराला ओळखपत्रासह येणे आवश्यक असेल. समन्समध्ये दूरस्थ बिंदूवर असलेल्या आर. पी. सी. चे नाव आणि संपर्क तपशील देखील असतील आणि

साक्षीदाराला गरज भासल्यास, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून कायदेशीर साहाय्य किंवा इतर मदत घेता येईल, असेही नमूद केले जाईल.

७. बाल साक्षीदाराला लैंगिक अपराधांपासून मुलांचे संरक्षण नियम, २०२० किंवा इतर कोणत्याही लागू कायदा/मार्गदर्शक तत्त्वांमध्ये परिभाषित केल्यानुसार किंवा न्यायचौकशी न्यायालयाने परवानगी दिल्याप्रमाणे आश्वासक व्यक्तीला उपस्थित ठेवण्याचा अधिकार मिळेल. न्यायचौकशी न्यायालयापुढे, बाल साक्षीदारांचा पुरावा नोंदविताना ज्या सर्वोत्तम पद्धतींचे पालन करणे आवश्यक आहे, ते वीडियो- कॉन्फ्रेंसिंगद्वारे साक्ष नोंदविताना देखील पाळले गेले पाहिजे. बाल साक्षीदाराला त्याने / तिने दूरस्थ बिंदूवर पोहोचण्यासाठी किती अंतर पार केले आहे याच्या आधारे आहार भत्ता दिला जात आहे की नाही याची खात्री करणे, दूरस्थ बिंदूवर बाल साक्षीदार आरोपीच्या (जामिनावर बाहेर असल्यास) किंवा आरोपीच्या कोणत्याही नातेवाईकाच्या संपर्कात येणार नाही याची खात्री करण्यासाठी दूरस्थ बिंदूवर पोलिस अधिकाऱ्याची उपस्थिती आणि कायद्याने/संबंधित मार्गदर्शक तत्त्वांनुसार/राज्यांद्वारे पाळल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही सर्वोत्तम पद्धतींचा यामध्ये समावेश आहे.

८. कागदपत्रांची प्रत जर चिन्हांकित करणे किंवा साक्षीदाराला दाखवणे आवश्यक असेल, तर न्यायालयाद्वारे आर. पी. सी. कडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रसारित केले जाऊ शकते. दूरस्थ बिंदूवरील आर. पी. सी साक्षीदाराची तपासणी नोंदविण्यास मदत करेल आणि याची खात्री करेल की कोणतीही शिकवणी दिली गेलेली नाही खोलीत कोणतीही अनधिकृत व्यक्ती किंवा ध्वनिमुद्रण साधन उपस्थित नाही.

९. आर. पी. सी. (दूरस्थ बिंदू समन्वयक) शक्य त्या सर्व उपाययोजना करू शकतो आणि बाल साक्षीदार आरामात आहे याची खात्री करण्यासाठी आश्वासक व्यक्तीची मदत घेऊ शकतो. सरकारी अभियोक्ता /बचाव पक्षाच्या अधिवक्त्याने उपस्थित केलेले प्रश्न विद्वान न्यायचौकशी न्यायाधीशांपुढे ठेवले जाऊ शकतात, जे त्या बदल्यात साक्षीदारापुढे ठेवतील आणि न्यायचौकशी न्यायालय सदर साक्षीदाराची साक्ष नोंदवेल. आर. पी. सी. भाषांतरासाठी

मदत करू शकतो किंवा आवश्यक असल्यास अनुवादक किंवा विशेष शिक्षकाची मदत घेऊ शकतो किंवा विद्वान न्यायचौकशी न्यायालयाला आवश्यक असलेली इतर कोणतीही मदत देऊ शकतो.

१०. पुराव्याची नोंदणी पूर्ण झाल्यावर, न्यायचौकशी न्यायालयाद्वारे दूरस्थ बिंदूवर असलेल्या आर. पी. सी कडे ई-मेलद्वारे साक्ष पाठविली जाईल, जो प्रिंट-आउट घेऊन साक्षीदाराला वाचून दाखवेल. मुलाच्या अंगठ्याचा ठसा / स्वाक्षरी सह, कायद्यानुसार अभिसाक्ष योग्य आणि सत्यापित आहे याची खात्री केल्यानंतर, आर. पी. सी. ते प्रमाणित करू शकतो आणि सदर अभिसाक्ष, कायद्याने परवानगी दिल्याप्रमाणे स्पीड पोस्टद्वारे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे न्यायचौकशी न्यायालयात सुरक्षित पद्धतीने परत पाठवू शकतो. काही कारणास्तव स्पीड पोस्ट गहाळ झाल्यास, आर. पी. सी. द्वारे मूळ प्रत देखील ठेवली जाऊ शकते.

११. जेव्हा जेव्हा न्यायचौकशी न्यायालय दुसऱ्या राज्यात राहणाऱ्या बाल साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याचा प्रस्ताव मांडतो, तेव्हा त्याबाबतची सूचना न्यायालय बिंदू वर असलेल्या उच्च न्यायालयाच्या प्रबंधकास सुद्धा दिली पाहिजे. नंतर विद्वान प्रबंधक याची माहिती मुलाची साक्ष नोंदविण्यासाठी शक्य ती सर्व मदत करण्याच्या विनंतीसह दूरस्थ बिंदूवर असलेल्या उच्च न्यायालयाच्या विद्वान प्रबंधकास देऊ शकतात.

१२. ही मानक संचालन प्रक्रिया (एस. ओ. पी) केवळ एक व्यापक मार्गदर्शक तत्व आहे. साक्ष नोंदविण्याची कार्यपद्धती आणि रीत संबंधित उच्च न्यायालयांनी तयार केलेल्या वीडियो-कॉन्फ्रेंसिंग नियमांवर अवलंबून असेल, जी बाल साक्षीदाराची साक्ष नोंदविताना लक्षात ठेवली जाईल. हे लक्षात ठेवले पाहिजे की साक्ष नोंदविण्याचे काम अनावश्यक विलंब न करता जलदगतीने केले पाहिजे.

[१] हे तालुका स्तरावरही केले जाऊ शकते कारण काही प्रकरणांमध्ये, तालुका स्तरावर किंवा उपविभागीय स्तरावर न्यायालयीन संकुलात वीडियो- कॉन्फ्रेंसिंग कक्ष उपलब्ध असू शकतो".

५.	भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २४ मध्ये, कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलाला कामावर ठेवण्यास मनाई आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ (फ) मध्ये मुलांना निरोगी रीतीने आणि स्वातंत्र्य आणि सन्मानाच्या परिस्थितीत विकास करण्याची संधी आणि सुविधा उपलब्ध करून देणे आणि बालपणात आणि तरुणपणात शोषणापासून आणि नैतिक आणि भौतिक परित्यागापासून त्यांचे संरक्षण सुनिश्चित करणे हे राज्याला बंधनकारक आहे. बालहक्कांवरील संयुक्त राष्ट्रांच्या अधिवेशनात हिंसा आणि शोषणापासून मुलांचे संरक्षण करण्याच्या गरजेवर भर देण्यात आले आहे. बाल कामगार कायदा या उद्देशाने आणला गेला की, ज्या मुलांनी वयाचे चौदावे वर्ष पूर्ण केले नाही, त्यांना विशिष्ट व्यवसाय आणि प्रक्रियांमध्ये नोकरीवर ठेवण्यास बंदी घालण्यात येईल आणि या कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करून मुलांना नोकरीवर ठेवण्यासाठी वाढीव दंड लावता येईल. त्यातील कलम ३ मध्ये दिनांक ०१/०९/२०१६ पासून सुधारणा करण्यात आली. सदर कलम अन्वये, जेथे मुले त्यांच्या कुटुंबांना किंवा कौटुंबिक उपक्रमांना मदत करतात किंवा दृकश्राव्य मनोरंजन उद्योगात कलाकार म्हणून काम करतात आणि जेथे अशा कामामुळे त्यांच्या शालेय शिक्षणावर परिणाम होत नाही, ते वगळता कोणत्याही व्यवसायात किंवा प्रक्रियेत मुलांना नोकरीवर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारत सरकारने दिनांक २६/०४/२०१३ रोजीच्या निर्णयाद्वारे, मुलांसाठी राष्ट्रीय धोरण, २०१३ ("**२०१३ चे धोरण**") स्वीकारले. २०१३ च्या धोरणानुसार, मुलांवर परिणाम करणारे सर्व निर्णय आणि कृतींमध्ये मुलांचे सर्वोत्तम हित ही प्राथमिक चिंता आहे, मग ते निर्णय वैधानिक संस्था, न्यायालये, प्रशासकीय अधिकारी, सार्वजनिक, खाजगी, सामाजिक, धार्मिक किंवा सांस्कृतिक संस्थांनी घेतले असोत. याव्यतिरिक्त राज्य हे सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध आहे की, सर्व शाळाबाह्य मुले जसे की बालकामगार, स्थलांतरित मुले, तस्करी झालेली मुले, स्थलांतरित मजुरांची मुले, रस्त्यावरील मुले, दारू आणि मादक पदार्थांच्या व्यसनाला बळी पडलेली मुले, नागरी अशांतता असलेल्या भागातील मुले, अनाथ, दिव्यांग मुले (मानसिक आणि शारीरिक), दीर्घ आजार असलेली मुले, विवाहित मुले, सफाई कामगारांची मुले, लैंगिक कामगारांची मुले, कैद्यांची मुले इत्यादींचा मागोवा घेतला जातो, त्यांची सुटका केली जाते, पुनर्वसन केले जाते आणि त्यांना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला जातो.

६.	तामिळनाडूतील शिवकाशी येथील फटाके कारखान्यांमध्ये मुलांच्या रोजगाराची दखल घेत, या न्यायालयाने **एम. सी. मेहता - विरुद्ध- तामिळनाडू राज्य आणि इतर** या प्रकरणामध्ये राज्य सरकारांना पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत :-

> **"३३.** उपरोक्त निर्देशांना आकार देण्यासाठी, संबंधित राज्यांनी पुढील गोष्टी कराव्यात, अशी आमची अपेक्षा आहे :-
>
> (१) वरील प्रकारच्या बालमजुरीचे सर्वेक्षण केले जाईल जे आजपासून सहा महिन्यांत पूर्ण केले जाईल.
>
> (२) सुरुवातीला, रोजगाराचा कोणता धोकादायक पैलू निकष म्हणून घेतला जाईल हे निर्धारित करण्यासाठी, अनुच्छेद २४ मध्ये नमूद केलेल्या रोजगाराच्या संदर्भात काम हाती घेतले जाऊ शकते, जे मुख्य क्षेत्र मानले जाऊ शकते. सर्वात धोकादायक रोजगार प्राधान्यक्रमात प्रथम क्रमांकावर असू शकतो, त्यानंतर तुलनेने कमी धोकादायक वगैरे. येथे नमूद केले जाऊ शकते की भारत सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय बालमजुरी धोरणात प्राधान्याने कारवाई करण्यासाठी काही उद्योगांची निवड आधीच करण्यात आली आहे आणि निवडण्यात आलेले उद्योग खालीलप्रमाणे आहेत :-
>
> तामिळनाडूतील शिवकाशी येथील आगकाडी उद्योग.
>
> गुजरातमधील सुरत येथील हिरा पॉलिशिंग उद्योग.
>
> राजस्थानातील जयपूर येथील मौल्यवान दगडी पॉलिशिंग उद्योग.
>
> उत्तर प्रदेशातील फिरोझाबाद येथील काच उद्योग.
>
> उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथील पितळी भांडी उद्योग.
>
> उत्तर प्रदेशातील मिर्झापूर-भदोही येथील हस्तनिर्मित गालिचा उद्योग.
>
> उत्तर प्रदेशातील अलीगढ येथील कुलूप बनवण्याचा उद्योग.
>
> आंध्र प्रदेशातील मरकापूर येथील स्लेट उद्योग.
>
> मध्य प्रदेशातील मंदसौर येथील स्लेट उद्योग.

(३) आमच्या निर्देशानुसार दिला जाणारा रोजगार इतर खात्रीशीर रोजगारासाठी जोडला जाऊ शकतो. असे केले जात असताना हे उघड आहे की, आमच्या निर्देशांसाठी जास्त रोजगार निर्मितीची गरज भासणार नाही.

(४) अशा प्रकारे दिला जाणारा रोजगार हा एक उद्योगही असू शकतो जिथे लहान मुलाला नोकरी दिली जाते, तो एक सार्वजनिक उपक्रम देखील असू शकतो आणि ते अंगमेहनतीचे काम असेल कारण वादग्रस्त मूल हाताने काम करण्यात गुंतलेले असणे आवश्यक आहे. नोकरीसाठी निवडलेले उपक्रम असे असेल, जे कुटुंबाच्या निवासस्थानाच्या सर्वात जवळचे असेल.

(५) ज्या प्रकरणांमध्ये वर नमूद केल्याप्रमाणे पर्यायी रोजगार उपलब्ध करून दिला जाणार नाही, त्या प्रकरणांमध्ये संबंधित मुलाच्या आई-वडिलांना /पालकांना मूळ निधी वर मिळणाऱ्या उत्पन्नाची रक्कम दिली जाईल, जी प्रत्येक मुलासाठी दरमहा रुपये २५,०००/- असेल. जर आई-वडिल / पालकांनी मुलाला शिक्षणासाठी पाठवले नाही तर दिलेला रोजगार किंवा दिलेली रक्कम थांबविण्यात येईल.

(६) मुलाची नोकरी बंद केल्यावर, त्याला एक चांगला नागरिक बनविण्याच्या दृष्टीने योग्य संस्थेत त्याचे शिक्षण आश्वासित केले जाईल. हे निदर्शनास आणून दिले जाऊ शकते की, अनुच्छेद ४५ सर्व मुलांसाठी १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत सक्तीचे शिक्षण अनिवार्य करते; ते विनामूल्य असणे देखील आवश्यक आहे. राज्यघटनेचे हे आवाहन पाळले जाते की नाही हे पाहणे निरीक्षकांचे कर्तव्य असेल.

(७) जिल्हा हा संकलनाचा घटक असू शकतो जेणेकरून जिल्ह्याचा कार्यकारी प्रमुख निरीक्षकांच्या कामावर लक्ष ठेवू शकतो. पुढे, कामाची व्याप्ती लक्षात घेता, साजेसा सरकारच्या कामगार विभागात एक स्वतंत्र कक्ष तयार केला जाईल. योजनेवर लक्ष ठेवणे देखील आवश्यक असेल आणि कदाचित विभागाचे सचिव हे काम करू शकतील. भारत सरकारच्या कामगार मंत्रालयाकडून एकूण देखरेख फायदेशीर आणि उपयुक्त ठरेल.

(८) भारत सरकारच्या कामगार मंत्रालयाचे सचिव आजपासून एका वर्षाच्या आत या न्यायालयाला उपरोक्त निर्देशांच्या अनुपालनाबाबत माहिती देतील. जर याचिकाकर्त्याला अनुपालन अहवालाच्या दृष्टीने आणखी काही किंवा इतर आदेशाची आवश्यकता असेल, तर तसे करण्यास त्याला मुभा असेल.

(९) आम्हाला असेही निरीक्षण करायला आवडेल की, दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी केल्यावर, १९८६ च्या उपरोक्त कायद्यात समाविष्ट असलेल्या दंडात्मक तरतुदीचा वापर अशा ठिकाणी केला जाईल जिथे कायद्याने प्रतिबंधित केलेला बालकामगार रोजगार आढळेल.

(१०) जोपर्यंत गैर-धोकादायक नोकऱ्यांचा संबंध आहे, निरीक्षकाला हे पाहणे आवश्यक असेल की, लहान मुलांचे कामाचे तास दिवसाला चार ते सहा तासांपेक्षा जास्त नसावेत आणि त्यांना दिवसाला किमान दोन तास शिक्षण मिळेल. शिक्षणाचा संपूर्ण खर्च नियोक्त्याने उचलला आहे हे देखील पाहिले जाईल".

७. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने वर्ष २०२१ हे बालमजुरी निर्मूलनाचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून प्रस्तावित केले आणि हे आंतरराष्ट्रीय वर्ष संयुक्त राष्ट्र महासभेने स्वीकारले. सर्व सदस्य राष्ट्रांना सक्तीचे श्रम आणि मानवी तस्करी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना करण्यास सांगितले होते. जागतिक स्तरावर गेल्या चार वर्षांत बाल कामगारांची संख्या वाढली आहे. संस्थांनी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, सरकारच्या सर्वोत्तम प्रयत्नांनंतरही भारतात बालमजुरीची समस्या कायम आहे. कोविड १९ चा समाजातील खालच्या स्तरातील मुलांवर विनाशकारी परिणाम झाला जे त्यांच्या पालकांनी रोजगार गमावल्याने आणि शाळा बंद झाल्याने त्रस्त झाले आणि त्यांना जगण्यासाठी मजुरी करावी लागली. मुलांच्या संरक्षणाचे महत्त्व आणि त्यांची सुटका आणि पुनर्वसन याचा पुनरुच्चार करण्याच्या उद्देशाने आम्ही या समस्येवर अधिक भर दिला आहे.

८. सध्या, आम्ही न्यायचौकशी न्यायालयात पुरावा देण्याच्या उद्देशाने लांबच्या प्रवासाच्या संदर्भात तस्करीच्या पीडितांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत चिंतित

आहोत. कोविड १९ महामारीच्या काळात पुरावा देण्यासाठी लांबचा प्रवास करण्यास भाग पाडल्या जाणाऱ्या तस्करी केलेल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत जनउत्साही याचिकाकर्त्यांना चिंता वाटत असली तरी, आमचे असे मत आहे की विद्वान न्यायमित्रांनी सुश्री शेनॉय यांच्याशी सल्लामसलत करून एस. ओ. पी. संबंधी सूचना नियमित वैशिष्ट्य म्हणून व्यवहारात आणल्या पाहिजेत. ही प्रक्रिया केवळ कोविड-१९ महामारीने प्रभावित झालेल्या कालावधीपुरती मर्यादित असण्याची गरज नाही. या न्यायालयाने **महाराष्ट्र राज्य-विरुद्ध- डॉ. प्रफुल्ल बी. देसाई** [२], **साक्षी-विरुद्ध-भारतीय संघराज्य आणि इतर** [३], तसेच **ईरा-विरुद्ध- राज्य (एन. सी. टी. दिल्ली) आणि इतर** [४] या प्रकरणांमध्ये वीडियो- कॉन्फ्रेंसिंगद्वारे पुरावे नोंदविण्याची अनुज्ञेयता विचारात घेतली आहे. **संपूर्ण बेहुरा-विरुद्ध-भारतीय संघराज्य आणि इतर** [५] च्या प्रकरणामध्ये, या न्यायालयाने खालीलप्रमाणे नमूद करून न्यायालयीन कार्यवाहीमध्ये तंत्रज्ञानाचा वापरास प्रोत्साहन दिले :-

> "**७७.** जे. जे. बी. (बाल न्याय मंडळे) तसेच सी. डब्ल्यू. सी. (बालकल्याण समिती) या दोन्हींद्वारे तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यंत महत्वाचे आहे आणि एम. डब्ल्यू. सी. डी. (महिला व बाल विकास मंत्रालय) ने केलेल्या प्रतिज्ञापत्रांवरून आणि सादरीकरणांवरून असे लक्षात आल्याने आम्ही निराश झालो आहोत की, जे. जे. बी. आणि सी. डब्ल्यू. सी. मध्ये संगणक आणि त्या अन्वये गौण साधनांची तीव्र कमतरता आहे. केवळ जे. जे. बी. आणि सी. डब्ल्यू. सी. च्या प्रभावी कामकाजासाठीच नव्हे, तर हरवलेल्या मुलांचा शोध घेणे आणि त्यांचा मागोवा घेणे, धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांची सुटका करणे, तस्करीची शिकार झालेली मुले, बालसंगोपन संस्था सोडणारी मुले, बाल लैंगिक शोषणाचे बळी पडलेली मुले आणि पाठपुराव्याची कारवाई यासारख्या वेळोवेळी उद्भवणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी देखील तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे. आपला देश हा एक तांत्रिक शक्ती असलेला देश आहे हे सर्वश्रुत आहे आणि जर आपण आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या साधनांचा लाभ घेऊ शकलो नाही आणि मुलांच्या हितासाठी संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचे फायदे पूर्णपणे वापरू शकलो नाही, तर तांत्रिक शक्ती असलेला देश म्हणून आपली स्थिती धोक्यात येईल आणि ती केवळ कागदावरच राहील. आकडेवारी, विशेषत: त्या प्रकारची विशालता असलेली,

ज्याच्याशी आपण संबंधित आहोत, ती संगणक आणि इंटरनेटच्या वापराद्वारे सहजपणे गोळा केली जाऊ शकते. संसाधनांचे नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी हे खूप उपयुक्त ठरेल आणि एम. डब्ल्यू. सी. डी. (महिला व बाल विकास मंत्रालय) आणि बाल हक्कांशी संबंधित इतरांनी याचा पुरेपूर लाभ घेतला पाहिजे.

**७८.** याशिवाय, संगणक आणि त्या अन्वये गौण साधनांचा वापर जे. जे. बी आणि सी. डब्ल्यू. सी च्या प्रशासकीय कामकाजात प्रचंड योगदान देईल यात शंका नाही. भारत सरकार आणि राज्य सरकार या दोघांनीही याकडे लक्ष देणे आणि जे. जे. बी आणि सी. डब्ल्यू. सी यांना स्पष्टपणे दिसणाऱ्या कारणांसाठी आवश्यक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर प्रदान करणे आवश्यक आहे. विद्वान अधिवक्त्याने आम्हाला माहिती दिली की, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील पोलिस अधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समितीशी सल्लामसलत करून माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर केला आहे आणि आमचे असे मत आहे की, नाविन्यपूर्ण पावलांना प्रोत्साहन दिले पाहिजे . त्याचप्रमाणे, वीडियो- कॉन्फ्रेंसिंगचा वापर योग्य प्रकरणांमध्ये देखील विचारात घेतला जाऊ शकतो जेथे विधिसंघर्षग्रस्त अल्पवयीन मुलांची काही गैरसोय झाल्यास वीडियो- कॉन्फ्रेंसिंगची सुविधा वापरणे आवश्यक आहे".

९. आम्ही एस. ओ. पी. च्या मसुद्याची काळजीपूर्वक तपासणी केली आहे, ज्यामध्ये दूरस्थ बिंदूवर असलेल्या बाल साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यासाठी उचलल्या जाणाऱ्या पावलांचा सूक्ष्म तपशील आहे. उच्च न्यायालयांनी प्रतिसाद दाखल केले आहेत. एस. ओ. पी. त्वरित अंमलात आणण्यास कोणत्याही उच्च न्यायालयाने आक्षेप घेतलेला नाही. आम्ही निर्देश देतो की, वर पुनरूध्द्रुत केल्याप्रमाणे, एस. ओ. पी. चे सर्व फौजदारी खटल्यांमध्ये पालन केले जाईल, जेथे न्यायालयीन बिंदूजवळ न राहणाऱ्या बाल साक्षीदारांची तपासणी केली जाईल आणि ज्या न्यायालयांमध्ये खटला चालविला जातो तेथे प्रत्यक्ष तपासणी केली

जाणार नाही. साक्षीदारांच्या तपासणीदरम्यान बाल-अनुकूल पद्धती अवलंबल्या जातील याची खात्री करण्यासाठी आम्ही आर. पी. सी. (दूरस्थ बिंदू समन्वयक) ला निर्देश देतो.

१०. आर. पी. सी. ला मानधन देण्याच्या स्रोताबाबत विद्वान न्यायमित्रांनी निर्देश मागितले होते. आम्हाला विद्वान न्यायमित्रांनी अशी माहिती दिली आहे की, प्रायोगिक प्रकल्पादरम्यान ज्या आर. पी. सी. ची नियुक्ती करण्यात आली होती, त्यांना रुपये १५००/- दैनिक मानधन म्हणून देण्यात आले होते. सध्या आमचे मत आहे की, आर. पी. सी. ला मानधन म्हणून दररोज रुपये १५००/- दिले जातील. आम्ही सुश्री शेनॉय यांच्याशी सहमत आहोत की, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१२ गुन्हेगारी न्यायालयाला, कोणत्याही चौकशीला, खटल्याला किंवा इतर कार्यवाहीला उपस्थित असलेल्या साक्षीदारांचा खर्च भरण्यासाठी सरकारला निर्देश देण्याचे अधिकार देते.

११. विद्वान न्यायमित्र, जे एन. ए. एल. एस. ए. (राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण) च्या वतीने सुद्धा हजर झाले आहेत, त्यांना आम्ही दूरस्थ बिंदू समन्वयकाला द्यावयाच्या पगारशी संबंधित खर्च उचलण्याच्या एन. ए. एल. एस. ए. च्या इच्छेबाबत सूचना मिळविण्याची विनंती केली. एन. ए. एल. एस. ए. च्या सूचनेनुसार विद्वान न्यायमित्रांनी पुढीलप्रमाणे प्रस्ताव दिले :-

(१) वीडियो- कॉन्फ्रेंसिंगद्वारे बाल साक्षीदार(अनेक) च्या तपासणीच्या उद्देशाने जेव्हा केव्हा दूरस्थ बिंदू समन्वयकाची गरज असेल, तेव्हा एन. ए. एल. एस. ए, दूरस्थ बिंदू समन्वयकाला (आर. पी. सी.) दररोज रुपये १५००/- देईल.

(२) जर मुलाचे प्रतिनिधित्व वकील करत नसेल तर, एन. ए. एल. एस. ए मुलाला कायदेशीर सहाय्य प्रदान करेल ज्या दिवशी तो/ती त्याच्या/तिच्या परीक्षेवरून परत येईल.

१२. उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि आसाम या राज्यांमधील डी. एल. एस. ए. कार्यालयांमध्ये वीडियो- कॉन्फ्रेंसिंगची सुविधा बळकट करण्यासाठी एन. ए. एल. एस. ए. ने घेतलेल्या भूमिकेचे आम्ही कौतुक करतो, जेणेकरून न्यायालय संकुलात वीडियो-

कॉन्फ्रेंसिंगची सुविधा उपलब्ध नसेल तर बाल साक्षीदाराचे पुरावे नोंदवण्यासाठी डी. एल. एस. ए. च्या कार्यालयातील वीडियो- कॉन्फ्रेंसिंगच्या सुविधेचा वापर केला जाऊ शकेल.

१३. डी. एल. एस. ए. आणि न्यायालय संकुलाच्या कार्यालयांमध्ये बाल साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यासाठी वीडियो- कॉन्फ्रेंसिंगच्या सुविधेची उपलब्धता आणि दिनांक ३०/०४/२०२२ पर्यंत आर. पी. सी. चे नाव आणि संपर्क क्रमांक त्यांच्या संकेतस्थळावर आणि राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या (एस. एल. एस. ए.) संकेतस्थळावर टाकण्यासाठी देखील एन. ए. एल. एस. ए. पुढे आली आहे.

१४. दूरस्थ बिंदूवर असलेले संबंधित न्यायिक अधिकारी आणि न्यायचौकशी न्यायालय हे सुनिश्चित करतील की जेथे आवश्यक असेल तेथे पुराव्याचे ध्वनिमुद्रण कॅमेऱ्यात केले जाईल.

दिनांक २ मे, २०२२ रोजी सूचनापटलच्या शेवटी प्रस्तुत प्रकरण सूचीबद्ध करा.

(गीता आहुजा) (आनंद प्रकाश)

कोर्ट मास्टर कोर्ट मास्टर

**<u>न्यायनिर्णयाची यादी</u>**

२(२००३) ४ एससीसी ६०१

३ (२००४)५ एससीसी ५१८

४(२०१७)१५ एससीसी १३३

५ (२०१८) ४ एससीसी ४३३

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच

सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X